बैठकीचे इतिवृत्त

दिनांक २४/०२/२०२६

दिनांक २४/०२/२०२६ रोजी शासन परिपत्रक क्र डीपीपी २०१५ /प्रक्र /५०/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ नुसार पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा.गु.अ.वि. मुंबई यांच्या अध्यक्षते खाली गठीत समितीची नियोजीत बैठक अध्यक्षांच्या दालनात पार पडली.

<u>सदर बैठकीस खालील सदस्य हजर होते.</u>

१) श्री.मिलिंद काठे, पोलीस निरीक्षक, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई........... सदस्य
२) श्री. जालींदर डोईफोडे, विधी अधिकारी , मुंबई....... सदस्य

शासन परिपत्रक क २०१५/प्र.क ५१/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ मधील शासनाच्या सुचने प्रमाणे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास त्या संदर्भात दिनांक २४/०२/२०२६ रोजी दुपारी ०४.१५ वा. खालील गुन्हयातील आरोपी निर्दोष सुटल्याने बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये माहे ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील आरोपी निर्दोष सुटलेल्या गुन्हयाचा आढावा घेण्यात आला.

सदर बाबत कक्ष १ ते ५, मालमत्ता कक्ष, खंडणी विरोधी पथक व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक या कक्षांचा माहे ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील अहवाल मागविण्यात आले होते. प्राप्त अहवाला मधील कक्ष १ यांनी पाठविलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन परिपत्रकातील प्रपत्राप्रमाणे अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

सदर चर्चा करुन दुपारी ०४.३० वाजता बैठक संपविण्यात आली.

(जालींदर डोईफोडे)
विधी अधिकारी
गुन्हे शाखा, मुंबई

24/2/2026
( मिलिंद काठे)
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा. मुंबई

( राज तिलक रौशन )
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा. मुंबई

Scanned with CamScanner

( शासन परिपत्रक ,गृह विभाग, क्र डीपीपी-२०१५ /प्र.क्र ५१/पोल १०, दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ सोबतचे प्रपत्र )

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, मुंबई

समितीच्या बैठकीचा दिनांक :- / ०२ /२०२६

## माहे ऑक्टोबर -२०२५ ते डिसेंबर २०२५ पर्यतचा अहवाल

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कक्ष -१ | कोर्ट केस क्र. ८६५/पीडब्ल्यु/ २००९ | वि.स्था.ख.क्र. ५७/२००८ कलम ३,२५ भाहका. दि. | दोषारोप पत्र दाखल दि. ३०/०९/२००९ न्यायनिर्णय दि. २४ /११/२०२५ | १) पोलीस कर्मचाऱ्यांच्या साक्षीशिवाय इतर कोणताही स्वतंत्र पुरावा रेकॉर्डवर आला नाही.<br>२) स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब घेण्यात आलेले नाहीत.<br>३) शस्त्र जप्ती पंचनामा मधील पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. (पंच साक्षीदार मिळून आले नाहीत.) | निरंक | निरंक | — |
| २ | कक्ष -१ | कोर्ट केस नं ७६/पीडब्ल्यु / २००८ | गु.प्र.शा. गु.र.क्र. १०५/२००७ कलम ४६५,४६७,४६८, ४७१,४२० भादवि | दोषारोप पत्र दाखल दि. २१/०१/२००८ न्यायनिर्णय दि. १५ /१२/२०२५ | १) पोलीस साक्षीदारा व्यतीरिक्त कोणतेही स्वतंत्र साक्षीदार नाही.<br>२) आरोपीने बनावट कागदपत्रे तयार केली हे सिध्द करणारा कोणताही स्वतंत्र पुरावा रेकॉर्डवर नाही.<br>३) आरोपीच्या ताब्यातून बनावट कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत हे सिध्द करणारा पुरावा रेकॉर्डवर नाही.<br>४) आरोपीतांनी सामाईक उददेशाने बनावट पासपोर्ट व व्हिजा तयार केला हे दर्शवणारा पुरावा रेकॉर्डवर नाही.<br>५) सरकारी पक्ष संशयाच्या पलीकडे जाउन आरोपी विरुध्द केस सिध्द करू शकले नाही. त्याचा फायदा आरोपीला मिळून आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | निरंक | निरंक | — |

( जालींदर डोईफोडे )
विधी अधिकारी.
गुन्हे शाखा, मुंबई

२४/२/२०२६
( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

(राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई.

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कक्ष -१ | कोर्ट केस नं १३१/पीडब्ल्यु / २००३ | गु.प्र.शा. गु.र.क्र. ७०/२००२ कलम ४६५,४६७,४६८, ४७१,४२० भादवि | दोषारोप पत्र दाखल दि. २६/०८/२००३<br><br>न्यायनिर्णय दि. १६ /१२/२०२५ | १) साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीवरून असा निष्कर्ष येत आहे की, पुष्पा चालवाडी साठी आरोपी मंत्रालयात निवेदन पत्रे सादर करत असे व त्यासाठी पुष्पा चालवाडी आरोपीला पैसे देत असे<br>२) साक्षीदार क्र. ०२ यांने उलट तपासणी मध्ये मान्य केले की, आरोपीने त्यांची फसवणूक केलेली नाही. (साक्षीदार फितुर )<br>३) साक्षीदार क्र.३ राजेश गुप्ता यांना फसवले किंवा त्यांच्याकडून पैसे घेतले हे सिध्द करणारा कोणताही पुरावा नाही.<br>४) साक्षीदार क्र. ०५ गिरिजा पटेल यांच्या साक्षीनुसार आरोपी मे आणि जून २००२ मध्ये गृह विभागाच्या संदर्भात टायपिंगचे काम करण्यासाठी त्याच्या कडे आला होता. परंतू .प्रदशित A ते C मधील मजकूर माहीती नसल्याचे उलट तपासणी मध्ये मान्य केले.<br>५) निशांणी ९८ वर असणाऱ्या स्वाक्षऱ्या या वादग्रस्त आहेत त्यासंदर्भात तज्ञांनी कोणतेही मत दिलेले नाही.<br>६) निशाणी १२, ३६,४५,४६,९४ आणि ९५ नुसार त्यामध्ये जरी बनावट सहया केल्या आहेत त्या सिध्द करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नाही.<br>७) कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय असा निष्कर्श काढता येत नाही की, आरोपीशिवाय कोणीही त्या खोटया स्वाक्षऱ्या केल्या नाहीत जेव्हा कोणताही ठोस पुरावा नसतो, तेव्हा परिस्थितीजन्य पुराव्यावरुन असे सूचीत होणे आवश्यक आहे की आरोपीशिवाय अन्य कोणीही गुन्हा केला नाही सदर प्रकरणात आरोपीने स्वाक्षऱ्या खोटया केल्या आहेत ते सिध्द करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नाही. | निरंक | निरंक | — |

( जालींदर डोईफोडे )
विधी अधिकारी.
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काठे ) २४/१२/२०२६
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

(राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई.

Scanned with CamScanner